स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 04–09–2015** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 8. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 9. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 10. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 11. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 12. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 13. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 14. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 15. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2. श्री. जयंत दांडेगावकर, अति. उपायुक्त

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 157:— नागपूर शहरात विविध ठिकाणी म.न.पा. तर्फे उभारण्यात आलेल्या विद्युत खाबांवर किऑक्सव्दारे जाहिरातीचे अधिकार देण्यासंबंधात प्राप्त झालेली मे. गीत पब्लिसिटी यांची रु. ५४,५६,६१०/— ची महत्तम दराची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 158</u>:— नागपूर शहरात महिलांकरिता स्वतंत्र स्वच्छतागृहांची व्यवस्था करणे.

नागपूर शहरात महिलांकरिता सार्वजनिक ठिकाणी, बाजारपेठा व इतर गर्दीच्या ठिकाणे अशा स्थळांवर स्वच्छता गृह उभारण्याच्या योजनेत सहभागी होण्याची इच्छा प्रदर्शीत करून ''रोटरी क्लब, नागपूर ईशान्य'' यांनी चार स्थळांवर त्यांच्या खर्चाने महिला शौचालय बिनशर्त उभारण्याच्या मागीतलेल्या परवानगीस स्थायी समितीने ठराव क्र. 133, दि. 31.07.2015 अन्वये, विहीत अटींचे अधिन राहुन मान्यता प्रदान केली असता सदर ठरावाच्या क्रियान्वयनापुर्वीच ''रोटरी क्लब, नागपूर ईशान्य'' यांनी काही सवलतीसह एकुण 50 जागावर त्यांच्या खर्चाने महिला स्वच्छता गृहे उभारण्याच्या सादर केलेला सुधारीत प्रस्तावास विचारात घेण्यात येवुन स्थायी समिती पुर्व ठराव 133, दि. 31. 07.2015 रद्द करून ''रोटरी क्लब, नागपूर ईशान्य'' यांना उक्त परवानगी देण्यासंबंधी विभागाच्या खालील प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेऊन,

1) रोटरी क्लब यांच्या खर्चाने उभारण्यात येणाऱ्या स्वच्छतागृहाचे 5 वर्षा ऐवजी म.न.पा. च्या मंजूर जाहिरात धोरणानुसार 3 वर्षाकरिता त्यांच्या सहयोगी कंपनीचे ब्रॉडींग (जाहिरात) करण्याचे हक्क देणे.
2) म.न.पा. जाहिरात धोरणानुसार प्रत्येक स्वच्छतागृहावर लावावयाच्या जाहिरातीचे भुभाटक+परवाना शुल्क यांचे एकुण वार्षिक शुल्क अदमासे रू. 66000/— इतके आहे. मात्र प्रत्येक स्वच्छतागृहाच्या देखभालीचा व संचालनाचा वार्षिक खर्च अदमासे 162000/— प्रती वर्ष असुन जाहिरातीच्या शुल्कापोटी म.न.पा.स देणे असलेल्या रू. 66,000/— च्या बोज्यातुन रोटरी क्लब व सहभागी कंपनी यांना मुक्त करून पर्यायाने स्वच्छता गृहाच्या संचालन व देखभाल खर्चात म.न.पा.ने सहभाग देणे.
3) स्वच्छतागृहासंदर्भातील शासन परिपत्रक वर्ष 2001 मधील निर्देशांनुसार मुत्री निःशुल्क असणे आवश्यक आहे. तसेच शौचाकरिता म.न.पा.चा मंजुर दर रू. 4/— प्रती व्यक्ति असुन रोटरी क्लबने सुचविलेले शुल्क रू. 5/— प्रती व्यक्ति, वाढीव वाटत असले तरी सुटया नाण्यांच्या उपलब्धते अभावी वापर करणाराची होणारी अडचण टाळण्यास अनुकुल असल्यामुळे त्यास मान्यता देणे.
4) स्वच्छतागृहामध्ये पाणी मिटर व विजेचे मिटर म.न.पा.चे नावे बसविण्यात येईल मात्र विजेचे व पाण्याचे नियमीत देयक रोटरी क्लबने मान्य केल्याप्रमाणे 'रोटरी क्लब' द्वारा संबंधीत संस्थांना अदा केले जाईल.
5) उक्त महिला स्वच्छतागृहे, उच्च न्यायालयाच्या याचिका 98/2011 मधील आदेशाचे अनुपालनाअंतर्गत उभारण्यात येत असल्यामुळे या स्वच्छतागृहांचे संचालन, महिलांकरिता कार्य करणाऱ्या संस्थांच्या सहभागाने करणे. तसेच त्यांचे संचालन व देखभाल कार्य यावर देखरेख ठेवणाऱ्या झोन स्तरावरील सनियंत्रण समितीच्या दिशा निर्देशांनुसार करणे गरजेचे राहील.
6) स्वच्छतेमधील त्रृटींच्या संदर्भात म.न.पा. स्वास्थ्य विभागाद्वारा त्यांच्या नियमांनुसार आणी संनियंत्रण समितीच्या निर्देशानुसार कारवाईस पात्र राहिल.
7) उपरोक्त अटी शर्तीवर 'रोटरी क्लब' नागपूर ईशान्य या संस्थेस त्यांनी मागणी केलेल्या एकुण 50 स्थळांऐवजी प्रथम टप्प्यात 25 स्थळे मंजुर करण्यात येवून त्यातील खालील पाच स्थळांवर प्रायोगीक तत्वांवर स्वच्छतागृहे उभारण्यास व त्यांचे पुढील 3 वर्षाकरिता संचालन आणि देखभाल करण्यास तसेच या 5 स्थळांवरील काम

पूर्ण झाल्यानंतर उर्वरित 20 स्थळांपैकी 5–5 स्थळांच्या 4 टप्प्यांमध्ये सुयोग्य स्थळांची प्राथम्यानुसार निवड करून संस्थेस उपलब्ध करून देण्यात येईल.

1) व्हेरायटी चौक, ईटरनिटी मॉल समोर, फुटपाथवरील पार्किंगच्या जागेत, गठई दुकानाच्या बाजुला.
2) वर्धा रोड, पंचशील चौक–धिरज कन्या शाळेलगतच्या फुटपाथवर
3) इतवारी – नंगा पुतळा जवळ, पोलिस क्वार्टरच्या बाजुला
4) गोकुलपेठ मार्केट परिसरात – हरणे महिला इमारतीच्या जवळ, फुटपाथवर
5) छत्रपती चौक, एस.टी. स्टॅन्ड जवळील फुटपाथवर

मंजुर म.न.पा. जाहिरात धोरणानुसार 3 वर्षानंतर पुढील देय विहीत मुदतवाढ, संस्थेच्या समाधानकारक कामाच्या अधिन राहील.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन स्थायी समितीने ठराव क्र. 133 दिनांक 31.07.2015 यांस जी मंजूरी स्थायी समितीने दिली त्या निर्णयावर ही स्थायी समिती कायम आहे त्या प्रमाणे प्रशासनाने पुढील कार्यवाई करावी, प्रशासनाने सादर केलेला प्रस्ताव नामंजूर या सुचनेसह प्रस्तावित विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 159</u> :– मा. सदस्यांनी सादर केलेला खालील ठराव मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार उपनिगम आयुक्त यांनी स्थायी समितीच्या सभेमध्ये वाचून दाखविला व त्यास समितीने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>–: ठराव :–</u>

नागपूर महानगरपालिकेतर्फे दरवर्षी विविध क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करीत असते. सद्या क्रिडा व सांस्कृतिक अधिकाऱ्यांचे पद रिक्त असल्यामुळे व या विषयाचे तज्ञ महानगरपालिकेकडे आस्थापनेवर नसल्यामुळे क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे विषय योग्य प्रकारे हाताळण्यात येत नाही असे दिसून येते.

करिता डॉ. हंबीरराव ह. मोहिते, सेवानिवृत्त क्रिडा व सांस्कतिक अधिकारी यांची क्रिडा व सांस्कृतिक सल्लागार म्हणून अनेझेय मानधनावर नियुक्ती करण्यास ही स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते.

सुचक – हस्ता/– ॲड. श्री. संजयकुमार बालपांडे
अनुमोदक – हस्ता/– श्री. संदिप सहारे
हस्ता/– श्री. दिपक पटेल
हस्ता/– श्री. किशोर गजभिये

**<u>ठराव क्रमांक 160</u>** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

उपायुक्त
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर